**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १६ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **अमरावती विमानतळाचं लोकार्पण आणि प्रवासी सेवेचा प्रारंभ; येत्या काळात सर्वात मोठे पायलट प्रशिक्षण केंद्र सुरू होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती**
2. **देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत साडेपाच टक्के वाढ**
3. **शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढविण्यासाठी चंद्रपूर वन अकादमी आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट इंग्लंड मध्ये सामंजस्य करार**
4. **नागपूरसह पूर्व विदर्भात आज वादळी पर्जन्यमानाचा इशारा**

**----------------------------------**

अमरावती विमानतळ

अमरावती विमानतळाचं लोकार्पण आज केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री किंजारिपु राममोहन नायडू, आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, अमरावती विमानतळ राज्याच्या विकासाला प्रगती देणारं महत्त्वाचं पाऊल आहे. अमरावतीच्या विकासाला या विमानतळामुळे चालना मिळणार असून ,वैमानिक प्रशिक्षण केंद्रातून अनेक विद्यार्थ्यांचं वैमानिक होण्याचं स्वप्न पूर्ण होणार आहे. दरम्यान याठिकाणी सर्वात मोठे पायलट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट तयार होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला -

***या ठिकाणी जी पायलट ट्रेनिंग स्कूल सुरू होणार आहे हि याकरता महत्त्वाचे आहे.या एका पायलट ट्रेनिंग स्कूलमुळे आपलं अमरावती हे जगाच्या नकाशावर येत आहे कारण साउथ ईस्ट एशियामधली सगळ्यात मोठी पायलट ट्रेनिंग, स्कूल हि अमरावतीवरून सुरु होते आहे आणि जवळपास दरवर्षी १८० पायलट ते अमरावती मध्ये याकडे तयार होतील. जवळपास ३४ विमान ज्या ठिकाणी पार्क असतीलच विमानाच्या ट्रेनिंग देतील आणि आपलं अशा प्रकारची पायलट स्कूल आल्यामुळे मोठ्या प्रमाणात इकॉनॉमिक ॲक्टिव्हिटी सुरू होते.***

तत्पूर्वी  केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,यांनी देखील लवकरच या विमातळावरून आंतरराष्ट्रीय सेवा सुरु होण्याबद्दल आशावाद व्यक्त केला -

***आज मुंबईला आपण जोडले गेलो आहे. पण पुढच्या काळात भविष्यात निश्चितपणे अमरावतीवरून देशात आणि राज्यात सुद्धा या इतर ठिकाणी सुद्धा विमानसेवा निश्चित पुढच्या काळामध्ये सुरू होईल.***

विमानतळावरच्या प्रवासी सेवेलाही प्रारंभ झाला असून पहिलं विमान धावपट्टीवर उतरलं. यावेळी एअर इंडिया उड्डाण प्रशिक्षण संस्थेच्या विमानउड्डाणाची प्रात्यक्षिकंही झाली. उद्घाटन समारंभाला केंद्रीयराज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसंच इतर लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या नंतर  मुख्यमंत्री यांच्या हस्ते अमरावती ग्रामीण पोलीस घटकातील मौजे कोंडेश्वर आणि  इतर ठिकाणच्या प्रशासकीय इमारती आणि निवासस्थान इमारतींचा तसेच शासकीय चारचाकी वाहनांचा लोकार्पण कार्यक्रम झाले.

------------------------------------

वस्तू आणि सेवा निर्यात

देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत साडेपाच टक्के वाढ नोंदली गेली आहे. एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या काळात, भारताने ८२० अब्ज ९३ कोटी डॉलर्स किमतीचा माल निर्यात केला. त्याआधीच्या आर्थिक वर्षात ,निर्यात झालेल्या मालाचं मूल्य ७७८ अब्ज१३ कोटी डॉलर्स होतं. केंद्रीय वाणिज्य मंत्रालयातर्फे जाहीर झालेल्या या आकडेवारीनुसार  देशाची व्यापारी तूट २१ अब्ज ५४ कोटी डॉलर्सची राहीली

------------------------------------

वेव्हज परिषद

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट म्हणजेच  वेव्हज परिषद ही जागतिक मनोरंजन परिसंस्थेला जोडण्यासाठी उचललेलं क्रांतिकारी पाऊल असल्याचं, प्रतिपादन अभिनेता आमीर खान यानं एका इंग्रजी दैनिकाशी बोलताना केलं आहे. मनोरंजन क्षेत्रातल्या व्यावसायिकांना व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टिकोनातून तसंच नवीन संधींच्या शोधात असलेल्यांना यात सहभागी होता येत आहे. त्यामुळे वेव्हज बाजार हा माध्यम आणि मनोरंजन उद्योगांसाठी व्यवसायवाढीचं केंद्र बनल्याचं आमीर खान याने म्हटलं आहे.

-----------------------------------

सद्भावना शांती यात्रा

नागपुरात झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर, काँग्रेस तर्फे आज  नागपुरात सद्भावना शांती यात्रा काढण्यात आली . या यात्रेत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला, अ. भा. सचिव कुणाल चौधरी . शहर अध्यक्ष आ. विकास ठाकरे यांच्यासह ,काँग्रेस नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले .लोकांमध्ये सद्भावना, शांती आणि सौहार्दाचा संदेश देण्यासाठी ही यात्रा आयोजित करण्यात आली होती.सद्भावना यात्रा सर्वप्रथम बीड येथे काढण्यात आल्याचे विकास ठाकरे म्हणाले

***महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष  हर्षकवर्धनजी  सपकाळ साहेब बीड येथे मस्सजोग मध्ये ज्या प्रकारच्या सत्ताधारांच्या नेतृत्वाखाली  गावगुंडानी रेतीचोरांनी  ऱ्हास आली  जेथून हत्या झाली  त्याचा  निषेध  बनवून तिथे जाऊन त्यांनी सगळ्यात पहिले यात्रा काढली***

दरम्यान गांधी गेट महाल येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून सद्भावना शांती यात्रेची सुरुवात करण्यात आली . यानंतर नरसिंग टॉकीज, कोतवाली चौक, बडकस चौक, चिटणीस पार्क चौक, देवडीया काँग्रेस भवन, भालदारपुरा चौक, गंजीपेठ गांधी पुतला मार्गे रजवाडा पॅलेस इथं यात्रेचा समारोप करण्यात आला.

-----------------------------------

प्रताप सरनाईक

लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान ,एसटी बसेस थांबत असलेल्या हॉटेल-मोटेल थांब्यावर प्रवाशांना आरोग्यदायी आणि किफायतशीर सुविधा मिळत नसतील, तर असे थांबे रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. या संदर्भात सध्या सुरू असलेल्या सर्व थांब्याचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल १५ दिवसात सादर करण्याच्या सूचना देखील त्यांनी एस. टी. महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांना केल्या आहेत.

वन अकादमी

शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढवून ,शैक्षणिक देवाण-घेवाण आणि आंतरराष्ट्रीय संबंध दृढ करण्यासाठी ,चंद्रपूर वन प्रशासन, विकास आणि व्यवस्थापन अकादमी, अर्थात वन अकादमी आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट इंग्लंड (UWE) ब्रिस्टल यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या अनुषंगाने युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट इंग्लंड, ब्रिस्टल येथील इकोसिस्टम सर्व्हिसेसचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मार्क एव्हरार्ड यांनी 13 ते 15 एप्रिल दरम्यान चंद्रपूर वन अकादमीला भेट दिली. भेटीदरम्यान डॉ. मार्क एव्हरार्ड यांनी वन अकादमीचे संचालक एम. श्रीनिवास रेड्डी आणि अकादमीच्या प्राध्यापकांशी सविस्तर चर्चा केली. याअंतर्गत दोन्ही संस्थांच्या सहभागाने संयुक्तपणे अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम ,चंद्रपूर वन अकादमीमध्ये आयोजित करण्यात येतील याशिवाय युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट इंग्लंड, ब्रिस्टलच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा व परिसंवाद आयोजित केले जातील.

---------------------------------

कवी कुलगुरू संस्कृत विद्यापीठ

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा त्रयोदश दीक्षांत समारंभ आज सकाळी 11ः00 वाजता कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथे संपन्न झाला. विश्वविद्यालयाचे कुलगुरू मा. प्रो. हरेराम त्रिपाठी हे दीक्षांत समारोहाच्या अध्यक्षस्थानी होते. समारोहात प्रमुख अतिथी या नात्याने प्रसिद्ध संस्कृत विद्वान् संस्कृत भारतीचे संस्थापक पद्मश्री मा. चमू कृष्ण शास्त्री, अध्यक्ष, भारतीय भाषा समिती, उच्च शिक्षा विभाग, केंद्र सरकार उपस्थित होते..या दीक्षांत समारोहात विश्वविद्यालयाचे कुलगुरू मा. प्रो हरेराम त्रिपाठी यांनी विद्यार्थ्यांना दीक्षांतोपदेश प्रदान केला. मा कुलगुरू महोदयांनी या दीक्षांत समारोहात 2023-24 मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विशिष्ट अतिथी श्री चमू कृष्ण शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत 2756 पदव्युत्तर पदवी, 4228 पदवी, 1367 पदविका, 109 पदव्युत्तर पदविका, व 97 प्रमाणपत्रासह मुक्त स्वाध्यायपीठम् द्वारा 278 पदव्युत्तर पदवी, पदविका व प्रमाणपत्र अशी एकूण 8854 पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली.

---------------------------------

हवामान

नागपूरसह ,पूर्व विदर्भात आज वादळी पर्जन्यमानाचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे.  नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, पश्चिम विदर्भातील अमरावती, यवतमाळ या ठिकाणी आज वादळी वाऱ्यांसह मेघगर्जना आणि अत्यंत हलक्या स्वरूपाची पर्जन्यवृष्टी होऊ शकते ,असा इशारा देण्यात आला आहे. भंडारा,गोंदिया आणि चंद्रपूर इथं उद्या देखील असंच पर्जन्यमान राहण्याचा अंदाज आहे. उर्वरित आठवड्यात मात्र वातावरण कोरडे राहणार असल्याची शक्यता आहे.

-----------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत , दिल्ली कॅपिटल्सचा सामना आज राजस्थान रॉयल्स बरोबर होईल. दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर, संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

-----------------------------------